# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ८२ वा ❑ बुधवार दि.०७ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## मुलीच अव्वल....!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीमधील महत्त्वाचा टप्पा असलेल्या बारावीचा निकाल सोमवारी ऑनलाइन जाहीर झाला. हा निकाल मेच्या पहिल्या वा दुसऱ्या आठवड्यात लागेल, अशी चर्चा सुरू असतानाच महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने रविवारी सकाळी निकालाची तारीख जाहीर केली. बारावीच्या विद्यार्थ्यांसह पालकांना आतुरता लागून राहिलेले महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या बारावीचा निकालाची अखेर निकालाची प्रतीक्षा संपली.

यात राज्याचा निकाल ९१.८८ टक्के इतका लागला असल्याची माहिती समोर आली आहे. तर राज्यात नेहमी प्रमाणे कोकण विभागाने आगेकूच करत सर्वाधिक ९६.७४ टक्के मिळवत अव्वल स्थान कायम ठेवले आहे. तर सर्वात कमी निकाल लातूर विभागाचा लागला लातूर विभागाचा निकाल ८९.४६ टक्के लागला.

मागील वर्षी प्रमाणेच या वर्षी देखील मुलींनी उज्वल यशाची परंपरा कायम राखत बाजी मारली आहे. सर्व विभागीय मंडळातून नियमित मुलींची उत्तीर्ण तिची टक्केवारी ९४.५८% असून मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५१ आहे म्हणजे मुलींची उत्तर देण्याची टक्केवारी मुलांपेक्षा ५.०७ टक्के ने जास्त आहेत. तर यंदा निकालाचा टक्का घसरला असल्याचे समोर आले आहे. फेब्रुवारी मार्च २०२४ चा निकाल ९३.३७% इतका होता. तर फेब्रुवारी मार्च २०२५चा निकाल ९१.८८ टक्के इतका लागला आहे. त्यामुळे निकालाचा टक्का १.४९ ने यंदा कमी लागल्याची समोर आले आहे. बारावीमध्ये एकूण १५४ विषयांची तपासणी करण्यात आली. यापैकी ३७ विषयांचे निकाल १०० टक्के लागले आहेत. सरकारच्या निर्णयानुसार खेळाडू, एनसीसी, स्काउट गाईडच्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त सवलतीचे गुण देण्यात आले आहेत.

या परीक्षेस राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम व आय.टी.आय. या शाखांसाठी एकूण १४,२७,०८५ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,१७,९६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून त्यापैकी १३,०२,८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व उत्तीर्णतेची टक्केवारी ९१.८८ आहे.

खासगी विद्यार्थी म्हणून नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३६,१३३ एवढी असून त्यापैकी ३५,६९७ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून २९,८९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८३.७३ आहे. या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून एकूण ४२,३८८ पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४२,०२४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी १५,८२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ३७.६५ आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून एकूण ७,३१० दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७,२५८ दिव्यांग विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी ६,७०५ दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.३८ आहे.

सर्व विभागीय मंडळातून नियमित मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.५८% असून मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५१ % आहे. म्हणजेच मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ५.०७% ने जास्त आहे.

# राज्यात १६ ठिकाणी 'मॉक सिक्युरिटी ड्रिल'चे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानदरम्यान वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना बुधवारी दिनांक ७ मे रोजी विविध आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्जता तपासण्याच्या उद्देशाने मॉक सिक्युरिटी ड्रिल राबवण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्यातील १६ ठिकाणी सिक्युरिटी ड्रिल घेण्यात येणार आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत देशभरातील २४४ जिल्हा नागरी संरक्षण केंद्रांची स्थिती तपासण्यात आली. यामध्ये निवारा केंद्रे, इशारा देणारी यंत्रणा आणि समन्वय सुविधा कार्यरत आहेत की दुरुस्तीची गरज आहे, याचे मूल्यमापन करण्यात आले. या ड्रिलचा महत्त्वाचा भाग म्हणजे सामान्य नागरिकांना प्रशिक्षण देणे असणार आहे.

गृह मंत्रालयाकडून प्राप्त झालेल्या



माहितीनुसार, या मॉक ड्रिलमध्ये हवाई हल्ल्याचा इशारा देणाऱ्या सायरन आणि ब्लॅकआऊट (वीज बंदी) परिस्थितीला कसा प्रतिसाद द्यावा, यावर विशेष भर दिला जाणार आहे. नागरिकांना त्यांच्या घरी वैद्यकीय कीट, अतिरिक्त औषधे, टॉर्च आणि मेणबत्त्या ठेवण्याचे निर्देश दिले जाणार आहेत.

प्रशासनाने नागरिकांना सल्ला दिला आहे की, अशा परिस्थितीत मोबाईल उपकरणे आणि डिजिटल व्यवहार अयशस्वी ठरू शकतात. अशा परिस्थितीत तोंड देण्यासाठी आवश्यक ती रोख रक्कम जवळ ठेवावी. गृह मंत्रालयाने देशभरातील २४४ जिल्ह्यांमध्ये १०० हून अधिक संवेदनशील ठिकाणांची निश्चिती केली आहे. या मॉक ड्रिलमध्ये अनेक उपाययोजना समाविष्ट असणार आहेत. त्यामध्ये हवाई हल्ल्याचा इशारा देणारे सायरन वाजवणे, नागरिकांना नागरी संरक्षणाच्या उपाययोजनांचे प्रशिक्षण देणे, शत्रूच्या संभाव्य हल्ल्याच्या वेळी स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत मार्गदर्शन करणे, तसेच बंकर आणि खंदकांची स्वच्छता व तपासणी करणे यांचा समावेश आहे.

केंद्र सरकारच्या मॉक ड्रिलच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने हायअलर्ट जारी केला आहे. राज्य प्रशासनाकडून सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याच्या कडक सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य शासनाने अंतर्गत स्तरावर हालचालींना गती दिली असून, सर्व पालकमंत्र्यांसह इतर मंत्र्यांना संबंधित प्रशासनाशी सातत्याने संपर्कात राहण्याचे आदेश दिले आहेत. उद्या राज्यातील १६ ठिकाणी मॉकड्रिल आणि ब्लॅकआऊट होणार आहे.

### महाराष्ट्रात १६ ठिकाणी मॉकड्रिल

मुंबई, उरण-जेएनपीटी, तारापूर, पुणे, ठाणे, नाशिक, थळ-वायशेत, रोहा-धाटाव-नागोठाणे, मनमाड, सिन्नर, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर सृजनशीलतेसाठी धोकादायक – नितीन केळकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजनीगर** – अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर हा मानवी सृजनशीलतेसाठी धोकादायक आहे, असे मत साहित्य भारतीचे प्रदेश संघटनमंत्री नितीन केळकर यांनी रविवारी, ४ रोजी येथे व्यक्त केले. साहित्य भारतीच्या वतीने घेण्यात आलेल्या कथा लेखन स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते.

बन्सीलालनगर महापालिका शाळेत झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्य भारतीचे जिल्हाध्यक्ष नवनाथ पवार होते. व्यासपीठावर कथाकार गेणू शिंदे, स्पर्धेच्या परीक्षिका प्रा. डॉ. स्मिता अवचार, साहित्य भारतीचे नूतन देवगिरी प्रांताध्यक्ष प्राचार्य संजीव गिरासे यांची उपस्थिती होती. या वेळी विजेत्या स्पर्धकांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. या स्पर्धेसाठी कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व हा विषय देण्यात आला होता.

आपल्या भाषणात केळकर यांनी एआय तंत्रज्ञानात सृजनशीलता नाही, असे म्हटले जाते ते चुकीचे असल्याचे सांगितले. पण अशा तंत्रज्ञानाचा आपण कितपत वापर करावा, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. नवीन तंत्रज्ञानाच्या वापर वाढल्यामुळे आपल्याकडे असणारी कौशल्ये आपण विसरत चाललो आहोत. पूर्वी माझ्या ७०-८० फोन



नंबर पाठ होते. पाढे तर आपण कधीच विसरलो, असे केळकर म्हणाले.

या कार्यक्रमात बोलताना गेणू शिंदे, प्रा. अवचार यांनी बदलत्या कुटुंब व्यवस्थेवर भाष्य केले. दीपाली कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात कथा स्पर्धेविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन योगिता देवगिरीकर (कथले), तर आभार प्रा. डॉ. नागेश अंकुश यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीता धारूरकर, नारायण पांडव, विलास फुटाणे, आसाराम जाधव यांनी प्रयत्न केले. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, प्रा. शरद भोगले, श्यामल पोद्दार, मनोज तुळपुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### २२ जणांचा सहभाग

या स्पर्धेत संभाजीनगरमधून २२ जण सहभागी झाले होते. चार गटांत घेण्यात आलेल्या या स्पर्धेचा निकाल असा : गट नं २ प्रथम – पूजा कणके, द्वितीय – विशाखा उणे, गट नं : ३ प्रथम – वैशाली चव्हाण, गट नं : ४ : प्रथम – गीता संवत्सर, द्वितीय – सुधीर सेवेकर, तृतीय – शिला गवळे

## लक्षवेधी छायाचित्र....



वृक्षतोडीचे बोलके चित्र या चित्रकाराने रेखाटले आहे...

(छाया : सोशल मीडिया)

# मुंबईत १७ वा न्यूज मेकर अॅवार्ड समारंभ संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात महाराष्ट्र दिनानिमित्त जेष्ठ महिला पत्रकार डॉ. वैदेही ताम्हण यांचे तर्फे दरवर्षी दिला जाणारा न्यूज मेकर अॅवार्ड मुंबईत पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय संपर्क प्रमुख श्री रामलालजी हे होते. यावेळी ना. उदय सावंत तसेच ना. योगेश कदम, जेष्ठ गायिका उषा मंगेशकर, दलीत पँथरचे संस्थापक जे. वी. पवार, इतिहास अभ्यासक अप्पा परब, कलाकार अनु आगरवाल, चित्रपट निर्मात्या स्मिता जयकर यांना लाईफ टाईम अवॉर्ड देण्यात आला.

याप्रसंगी वेगवेगळ्या क्षेत्रात सामाजिक, धार्मिक योगदान असणाऱ्या मान्यवरांनाही हा अवॉर्ड देण्यात आला यात प्रामुख्याने जेष्ठ नाटय अभिनेते प्रशांत दामले,संदीप तांगडे बेस्ट आयपीएस अवॉर्ड कर्नल प्रभात सूद राष्ट्रीय सुरक्षा, महामंडलेश्वर पायल नंदगिरी, समाजसेवक डॉक्टर वेणुगोपाल राव, बेस्ट सर्जन डॉक्टर गोपाल गोस्वामी उत्कृष्ट स्तंभ लेखक,नंदिता पाठक सोशल इंटरप्रोनर, पंडित विद्याधर मिश्रा, वैदिक आचार्य यतीन्द्र कटारिया, हिंदी साहित्यिक महेश शेंडगे, अनमोल शर्मा, सोशल चेंज मेकर राणी सगर अरकडे, समाजसेवा जगन्नाथ सरकार, पश्चिम



बंगाल खासदार राजीवनाना पाटील, बेस्ट वर्किंग पॉलिटिसियन पुष्यमित्र भार्गव महापौर इंदौर, अनुगामी लोकराज्य महा अभियान संस्थेच्या पुण्याच्या सौ नयना चव्हाण पाटील, सामाजिक कार्यकर्त्या, सनातन संस्थेचे श्री अभय जी वर्तक अशा विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान यावेळी करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक श्री बसंतजी, मा. सदस्य, खादी एवं ग्रामोद्योग आयोग, भारत सरकार, महा मंडलेश्वर उमाकांत नंद सरस्वती जी महाराज शिवदासभाऊ सर्जे, (नीलकंठेश्वर देवस्थान, पुणे), ज्येष्ठ पत्रकार प्रकाश गोरे, अॅड नरसिंग संभाजीराव लगड, (बोर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन, जम्मू काश्मीर) यांची विशेष उपस्थिती होती.





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## वैचारिक प्रगल्भतेमुळे दृष्टीकोन बदलतो


ज्योतिर्मय साहित्य

दैनंदिन जीवन जगत असताना वर्तमानांत आपण काहीतरी शोधत असतो. हा शोध नेमका कशाचा असतो ह्याचा अंदाज अनेकदा आपल्याला येत नाही. खरं तर हा शोध आनंद प्राप्तीचा असणं आवश्यक असतं. अर्थात, प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असणं स्वाभाविक असतं. आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो ? ते अवलंबून असतं.

अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. आपल्या अंतर्मनांतील विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. ह्या विचारमंथनात आपल्याला वर्तमानातील वास्तवाचं भान राहणं महत्वाचं असतं. पण भूतकाळाच्या साठवणीतील आठवणीत रमलेल्या आपल्या अंतर्मनाला दुसरीकडे भविष्याची काळजी, चिंता करायची देखील सवय जडलेली असते. आजचा दिवस माझा, ह्या भावनेतून, दृष्टीकोनातून आपले विचार, वर्तन आणि व्यवहार होण्याची जाणीव होत राहणं महत्वाचं ठरतं.

एकप्रकारे सकारात्मक वातावरण निर्माण होऊन आपली क्रयशक्ती वाढल्याची प्रचीती येऊ लागते. आपलं दैनंदिन काम करत असताना आपण नवीन व्यक्तीमत्वांचा परिचय करून घेण्याचं उद्दिष्ट साध्य केलं पाहिजे. नव्यानं परिचय झालेल्या व्यक्तींकडून आपण अनेक नवनवीन गोष्टी, संकल्पना शिकू शकतो. त्याचा एकूणच आपल्या वैचारिक प्रगल्भतेच्या वृद्धीच्या दृष्टीकोनातून खूप चांगला उपयोग होऊ शकतो.

## जंगलाच्या छायेत बारटांग बेट




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य


इथे आम्ही जे दाट जंगल पाहत होतो, त्यामध्ये खूप उंच उंच वाढणारे गगनचुंबी वृक्ष आम्हाला आढळले. सूर्याचा प्रकाशही त्या जंगलामध्ये जमिनीपर्यंत क्वचितच पोहोचत असावा इतके ते दाट होते. हा प्रवास करताना वाहनात बसूनही त्या दाट जंगलाची, त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पसरणाऱ्या हिरव्या चादरीची, आणि मधूनच दिसणाऱ्या आदिवासी झलकांची एक अलिखित कहाणी आपल्या मनात उमटत राहते. ते आदिवासी इथे कशाप्रकारे राहत असतील याची कल्पना आपण मनाने करत असतो. आमच्या सोबत असलेला प्रेम नावाचा स्थानिक गाईड आम्हाला येथील आजूबाजूच्या परिसराची माहिती देत होता.




रस्त्याने असलेला हा दोन तासांचा प्रवास त्या रम्य वातावरणात कधी संपतो ते कळत नाही. आता आमचा पुढील प्रवास बोटीने होणार होता. पोर्ट ब्लेअरच्या गजबजाटातून आपण बाहेर पडलो की अंदमानचे एक वेगळेच रूप समोर येते शांत, रांगडे आणि गूढतेने भरलेले. हे निसर्गाचे आगळे वेगळे रूप एकाच वेळी आपल्याला आश्चर्यचकितही करते आणि प्रसन्नतेचा अनुभवही देते. आम्ही आता बारटांग बेटांवर पोहोचलो होतो. बारटांग बेट म्हणजे निसर्गाचं एक अनोखं नाट्यगृह, जिथं झाडांनी आच्छादलेल्या सावलीतून जाणाऱ्या वाटा, दलदलीचा सुगंध, आदिवासी संस्कृतीची छटा आणि जमिनीच्या गर्भातून उगम पावलेल्या गुहांची कहाणी या सगळ्या गोष्टींचे आपण साक्षीदार होतो.

बारटांगला पोहचल्यानंतर निसर्गाची खरी जादू सुरू होते एक बांधलेला घाट, त्यावर उभ्या असलेल्या विविध होड्या, आणि समोर दिसणाऱ्या दलदलीच्या विस्तीर्ण पाण्याचे दृश्य. पर्यंत जाण्याचा प्रवास हा फक्त नयनरम्य नसून, तो एक लयबद्ध अनुभव आहे. कधी छोट्या लाटांच्या नादात, तर कधी एका अरुंद नाल्यातून होडी पुढे जाते. सभोवतालचा शांत गूढपणा इतका खोल असतो, की मन नकळत अंतर्मुख होतं. येथे आणखी एक नयनरम्य असे दृश्य पाहायला मिळते. ते म्हणजे खारफुटीच्या जंगलाचे. त्यालाच असेही म्हणतात. ही झाडे एकमेकांच्या जवळ अगदी एकमेकात घुसून वाढली आहेत. त्यांची मुळे जमिनीवर एकत्र झालेली आपल्याला दिसतात. ही मुळे एवढी दाट आहेत की त्यांच्यात एखादा मनुष्य किंवा प्राणी अडकला तर त्याची सुटका होणे कठीण. परंतु असे सांगितले जाते की सुनामीच्या काळात याच जंगलांनी सुनामीचे आघात सोसल्यामुळे अंदमानचा इतर भाग सुरक्षित राहिला. पर्यावरणाचे रक्षण करणारे हे जंगल आहे.

(क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा (ड)

ज्योतिर्मय साहित्य

आणि देवतांच्या कोपाने भोगावे लागणारे दुःख म्हणजे अधिदैविक होय.

सज्जन वाचक मंडळी सांख्याचा वेद वाङ:मय विषय किती गहन होता आणि समर्थानी तो आपल्याला किती सोपा करून सांगितला हे तुम्हाला पटले असेल अशी मी आशा करते. आणि आता आपण पुढील निरूपणा कडे वळूयात.

पिंड व परिस्थिति यांच्या परस्पर क्रियाप्रतिक्रियांनी

जीवन चालते. आईच्या पोटात आल्यापासून जीवाचा परिस्थितीशी संबंध येतो. देह सुटे पर्यन्त तो रहातो.

पिंड व परिस्थिति यांच्या खेचाखेचीत पिंडावर जे

प्रतिकूल आघात होतात त्यांना संतमंडळी ताप म्हणतात.


माणसाला त्याच्या जीवनात स्वत:च्या देहापासून ताप होतो, मनापासून ताप होतो,इतर प्राण्यापासून ताप होतो,माणसापासून ताप होतो. हवा, पाणी, वीज,अग्नी,

सभोवतालची प्रतिकुल परिस्थिती नैसर्गिक शक्ति पासून ताप होतो. त्यांना तापत्रय असे म्हणतात.

जीवनात कुणीही या तापत्रया पासून सुटला नाही.

माणसाला दुःख नको असते त्याला सतत सुखाच्या पायघड्या हव्या असतात. पण दुःख किती प्रकाराने भोगावे लागते हे या तीन समासात समर्थानी सांगितले आहे. त्याचा सविस्तर विचार मांडण्याचा प्रयत्न करते.

कसं आहे मंडळी पहा मंडळी माझ्याकडे जर दररोज पंचपक्वानाचे ताट भर दुपारी बारा वाजता मिळाला. त्यावर मुखशुध्दी साठी ताबूल विडा मिळाला. टच्च जेवल्यावर अंमळ मला वामकुक्षी घ्यायला मिळाली. नंतर चार वाजता गरम गरम वाफाळलेला आलं सुंठ भरपूर दुध घालून घट्ट (क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नाम सद्गुरूकडून घेणे श्रेयस्कर

ज्योतिर्मय साहित्य

नाम सद्गुरूकडूनच घेणे जरूर आहे की ते आपणच आपल्या आवडीप्रमाणे घेतले तरी चालेल ? वास्तविक भगवंताचे नाम स्वत:सिद्ध आहे आणि परिपूर्ण आहे; त्याला दुसर्या कुठून पूर्णता प्राप्त करून घ्यायची असते असे नाही. म्हणून सद्गुरूकडून घेतलेले नाम आणि आपण स्वत:च्या पसंतीने घेतलेले नाम ह्यांत फरक करता येत नाही. तरीसुध्दा सद्गुरूकडून घेतलेल्या नामाचे वैशिष्टय आहेच. ते असे की तो त्या नामाच्या पाठीशी सत्तारूपाने असतो आणि आपल्याकडून नामस्मरण होण्यात त्याची आपल्याला फार मदत होते. त्यामुळे आपल्या हातून होत असलेले नामस्मरण त्याच्या सत्तेनेच होत आहे ही जाणीव राहून मी नामस्मरण करतो अशा तर्हेचा अहंकार उत्पन्न व्हायला वावच राहात नाही. सद्गुरूच्या आज्ञेचे पालन करता करता साधकाला नामाची गोडी लागते आणि नाम पोटभर घेतल्याने त्याचा आत्मा तृप्त होतो. म्हणून सद्गुरूकडून नाम घेणे जरूर आहे. सद्गुरूची भेट होईपर्यंत मात्र आपण आपल्याकडून नामस्मरण करीत राहणे आवश्यक आहे कारण ते नामस्मरणच आपल्याला सद्गुरूची भेट करवून देईल. तसे पाहता आधी संताची भेट होणे कठीण; समजा भेट झाली तरी त्याच्यावर विश्वास बसणे त्याहून कठीण असते. म्हणून नामाचे साधन चालू ठेवावे. खडीसाखर ठेवली म्हणजे मुंगळयांना आमंत्रण करावे लागत नाही ते आपोआप तिचा शोध काढीत येतात. तसे तुम्ही खडीसाखर बना म्हणजे संत तुमच्याकडे धावतच येतील. खडीसाखर बना म्हणजे संतांना आवडेल असे वर्तन करा. संतांना काय आवडते ? भगवंताचे अनुसंधान आणि अखंड नामस्मरण याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट त्यांना प्रिय नाही. म्हणून आपल्या हृदयामध्ये नामाची ज्योत अखंड तेवत ठेवा. सद्गुरू तुमचा शोध घेत येतील आणि तुमच्यावर कृपेचा वर्षाव करतील.

आता अशा रीतीने सद्गुरूने नाम दिल्यावर एखाद्याला असे वाटेल की मी राम राम असे म्हणत होतोच आणि आता सद्गुरूने तेच सांगितले तर मग यात काय मोठे झाले? पण यातच विशेष आहे कारण यात मी कर्ता हा अभिमान टाकावा लागतो. सद्गुरूकडून नाम घेतले म्हणजे आपल्या कर्तेपणाच्या अभिमानाला वाव रहात नाही. मिठाचा एकच खडा खीर नासवायला कारणीभूत होतो. म्हणून अभिमान टाकणे ही गोष्ट फार महत्वाची ठरते. भगवंताचे नाम हे औषध समजावे भगवंताची प्राप्ती हे त्याचे फळ जरूर तेवढेच करणे, म्हणजे सांगितलेले तेवढेच करणे, जास्त न करणे, हे त्याचे अनुपान समजावे. औषध मात्र थेंबथेंब आणि सतत पोटात गेले पाहिजे.

साध्या शब्दांचासुध्दा आधार मोठा असतो मग भगवंताच्या नामाचा आधार केवढा मोठा असेल.

॥ संत - महात्म्य ॥

संकलन : मधुकर बोरीकर
9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)

## संत जनाबाई

ज्योतिर्मय साहित्य

या काळात विकारांचा लय झालेला असतो. काम क्रोध,लोभ मद मोह दंभ हे संपविल्या जातात. जीवात्म्या समोरील विकारांचे मुळभ हटून आत्मसूर्याची किरणे स्वच्छपणे बुद्धीत पडतात. ही साधना दृढ व्हायला लागते. महानंदाचा डोह साधकांना अनुभवयास मिळतो, व ज्यावेळेस सविकल्प समाधी संपून



निर्विकल्प समाधीकडे साधकाचा उत्कर्ष होतो त्या स्थितीत,समाधी किंवा साधना अवस्था सोडली तरीही व्यवहारात असतानाही जिकडे जिकडे नजर जाईल तिकडे तिकडे दिसणाऱ्या जड चेतन भूतमात्र इत्यादी सर्वत्र चैतन्याचा दिव्य प्रकाश या डोळ्याने पाहता येतो. अशा स्थितीत जनाबाई म्हणतात मी वाम सव्य म्हणजे डाव्या किंवा उजव्या बाजूला कुठेही पाहू द्या मला तो परमात्मा चेतन रूपात दिसतो आहे. त्या कृष्णाचे चैतन्य रूप मला सर्वत्र स्पष्टपणे दिसते आहे. मी खाली पाहिले, मी वर पाहिले, आजूबाजूला पाहिले, मागे, पुढे पाहिले, कुठेही पहा तोच परमात्मा मला दिसत आहे.

म्हणून तुकाराम महाराज याच स्थितीचे वर्णन असे करतात की,

ऐसी विष्णूची नगरी । चतुर्भुज नर नारी ।
सुदर्शन घरटी करी । रीग न पुरे कळिकाळा ।।

नामदेव महाराजांची आरती याच प्रकारे आहे.

लाजले गे माय आता कवणा ओवाळू /आता कवणा ओवाळू/ जिकडे पहावे तिकडे/ जिकडे पहावे तिकडे /चतुर्भुज गोपाळू//

असा चेतन रूप परमात्मा चराचरात दिसण्यासाठी साधकाच्या अंगी प्रत्येक वेळा प्रचंड योगाग्नी धडधडत असायला हवा. तरच ही दिव्य अनुभूती अनुभवता येते.

चराचरी जे जे दिसे तेथे अविद्याची नासे असे जनाबाई म्हणतात. चेतन तत्व सर्वत्र भरून राहिल्यावर अविद्या म्हणजेच राग द्वेष मोह अस्मिता आणि अभिनिवेश हे भेद उरत नाहीत. बुद्धीच समत्व येते. सुखदुःख मी तू पण यातही समत्व येते. बुद्धीतील विवेक वैराग्यांग्नी प्रखर वाढतो. यामुळे मोह स्नेहादि क्लेषांची कटके जळून जातात. बुद्धी शक्ती निर्मळ, अतिसूक्ष्म होते. आत्म शक्तीची समता तिच्यात आली, प्राण मन अहंकार बुद्धीत व बुद्धी आत्मा कडे वळली तरच अशी स्थिती येते. अशा बुद्धीत ‘‘परम भक्ती‘‘ उत्पन्न होते.

मन हे विरून गेले असल्यामुळे मी तू पण हे आठवत नाही. आपपर भाव समाप्त होतो. व बुद्धी ही सद्बुद्धी होते. असा दिव्य सद्बुद्धीचा अनुभव संत जनाबाई यांना आला होता. तो त्यांनी सोप्या शब्दात आपणांस सांगितला. पण ज्या खोलीवर ज्या साधनेच्या उंचीवर, ज्या तपाने साध्य झालेल्या आणि गुरुकृपेने पूर्ण झालेल्या साधनेचा हा दिव्य अनुभव आहे, त्या मागची खडतर तपश्चर्या आपण ध्यानी घ्यावी, म्हणजे आपणास या दिव्य अनुभूतीची सर्वोच्च उंची लक्षात येईल. या थोर विभूतीस कोटिकोटी प्रणिपात करून हा लेख येथेच संपवितो. जय जय राम कृष्ण हरी

(क्रमशः)



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णास्**
**त्रिभुवनमुपकारश्रेणिभिः प्रीणयन्तः।**
**परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं**
**निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ।।**

अर्थ – मन, वाणी, शरीर पुण्यामृताने ओतप्रोत आहे. आपल्या परोपकारांच्या राशीने तिन्ही लोकांना प्रसन्न करतात, दुस–याच्या परमाणुसमान अल्प गुणासही सदैव पर्वताप्रमाणे विस्तृत आणि उच्च मानतात तसेच आपल्या हृदयी प्रफुल्लित राहतात, असे किती संत आहेत? अर्थात असे संत नेहमीच विरळे असतात.

पुण्यशील, परोपकारी, परगुणप्रषंसनशील आणि स्वानंदसुखनिवासी असे सज्जन खरोखर दुर्मिळ असतात, असा भाव या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी व्यक्त केला आहे.



आरोग्य संजीवनी

## पिंपळाच्या पानांचा रस आरोग्यासाठी खूप गुणकारी

ज्योतिर्मय साहित्य

पिंपळाच्या पानांमध्ये औषधी गुणधर्म असतात. याच्या पानांचा रस पिणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. पिपळाच्या पानांमध्ये अनेक पोषक तत्व असतात, जे अनेक गंभीर आजार टाळण्यास मदत करतात.

कॅल्शियम, मॅंगनीज, तांबे, लोह यांसारखी खनिजे आणि प्रथिने, फायबर यांसारखी पोषक तत्त्वे पिंपळाच्या पानांमध्ये आढळतात. पिंपळाच्या पानांमध्ये भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडेंट, अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीबॅक्टेरियल आणि अँटीडायबेटिक गुणधर्म असतात, जे अनेक आजारांपासून दूर ठेवण्यास मदत करतात.

चला जाणून घेऊया पिंपळाच्या पानांचा रस पिण्याचे काय फायदे आहेत.

फुफ्फुस निरोगी ठेवा

पिंपळाची पाने फुफ्फुसासाठी फायदेशीर आहेत. पिंपळाच्या पानांचा रस फुफ्फुसांना डिटॉक्स करण्याचे काम करतो. हा रस प्यायल्याने फुफ्फुसातील जळजळ होण्याची समस्याही दूर होते. जर तुम्हाला श्वास घेण्यास त्रास होत असेल तर पिंपळाच्या पानांचा रस प्यायल्याने ही समस्या दूर होऊ शकते.

खोकला आराम

पिंपळाच्या पानांमध्ये असलेले गुणधर्म खोकला दूर करण्यासाठी प्रभावी ठरतात. याच्या रसाचे सेवन केल्याने खोकल्याची समस्या दूर होते, हा रस प्यायल्याने श्लेष्माची समस्या देखील दूर होते.

पचनासाठी फायदेशीर

पिंपळाच्या पानांचा रस प्यायल्याने डायरियाची समस्या दूर होते. जर तुम्हाला डायरियासोबतच मळमळण्याची समस्या असेल तर या रसाच्या सेवनाने या समस्येपासून सुटका मिळते. याशिवाय हा रस गॅस, अपचन, बद्धकोष्ठता आणि पोट फुगण्याची समस्या दूर करतो.

रक्त स्वच्छ करा

पिंपळाच्या पानांचा रस डिटॉक्स ड्रिंक म्हणून काम करतो. हा रस प्यायल्याने रक्त शुद्ध होते. रक्तातील अशुद्धता दूर झाल्यामुळे त्वचेच्या समस्या दूर होतात. हे पेय प्यायल्याने चेहऱ्यावरील पिंपल्स आणि डाग देखील दूर होतात.

साखर नियंत्रण हे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचे काम करते. पिंपळाच्या पानांमध्ये असलेले गुणधर्म स्पाइक नियंत्रित करतात आणि साखरेची पातळी सामान्य ठेवण्यास मदत करतात. पिंपळाच्या पानांचा रस मधुमेहाच्या रुग्णांसाठीही फायदेशीर आहे. दात आणि हिरड्या निरोगी करा :- पिंपळाच्या पानांचा रस दात आणि हिरड्यांसाठीही फायदेशीर आहे. यामुळे तोंडातील बॅक्टेरिया नष्ट होतात आणि दात निरोगी राहतात. पिंपळाच्या पानांचा रस प्यायल्याने हिरड्यांच्या त्रासातही आराम मिळतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९



॥ श्री राम कथा ॥

वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

मी कैकयीच्या पुत्रास राज्यावर बसवीन असे वचन दशरथाने कैकयीच्या वडिलास आधीच दिलेले असते.

दशराथाला वाईट वाटले.माणसाने किती आत्म केंद्रित असावे. तो कांहीही न बोलता तिथून सुमित्राच्या महाली आला. तिने नम्रतेने वंदन केले व त्यांना आसन दिले.ते म्हणे तुझे डोहाळे सांग !


ती म्हणे ज्येष्ठाची सेवा मला करावी वाटते. भक्ती प्रेमासाठी मोठ्यांची सेवा करा.असे भक्ती सूत्रात सांगितले आहे.दशरथाला आनंद झाला.तिथून ते कौशल्याच्या महाला गेले ती महालात नव्हती.ती उपवनात एका झाडाखाली ध्यानस्थ बसलेली होती.ती निर्विकार अवस्थेत होती,बेभान होती.तिला सावध केल्यावर ती म्हणे सर्वत्र राम भरले आहेत. मला धनुष्य बाण द्या रावण कुठे आहे?


कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

ती राम मय झाली होती. दशरथाला ही स्थितीही आवडली. यथावकाश तीनही राण्या प्रसूत होऊन राम,लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न असे चार बालके अवतरली. परमात्मा अवतरला.ते स्वतः ठरवून अवतार घेतात.अयोनी संभवाने अवतार होतो.सामान्य जन्म कर्मविपाकाने होतात. अवतार कसा होतो.ही संकल्पना वेदांताला मान्य नाही.तो वरून खाली आला असे म्हणणे योग्य नाही. कारण पारिछिन्नाला वर खाली हे भेद असतात.व्यापकत्वाला नसतात. व्यापकात विकार नसतात.जसे दुध कितीही जास्त असले तरी त्यास विरजण लागते.पण क्षीर सागराला विरजण लागणार नाही. कारण व्यापकत्वाला विकार नाही.

(क्रमशः)

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

रवींद्रनाथ स्वभावाने कवी होते परंतु त्यांनी साहित्याचे सर्व प्रकार हाताळले. त्यांच्या कथा आणि कादंबरी यात जसे काव्य आढळते, तसेच त्यांच्या नाटकातही गद्य आणि पद्य यांचा सुरेख संगम झालेला आपल्याला दिसतो. पण असे करताना नाटकातील कथावस्तूचे आणि सौंदर्याचे भान त्यांनी सुटू दिले नाही. त्यांनी लिहिलेली काही नाटके ही त्यांच्या आधीच्याच कथा, कादंबऱ्या आणि कवितांचा आशय घेऊन लिहिली आहेत. तर काही नाटके ऐतिहासिक आणि पौराणिक विषयांवर आधारित आहेत. त्यामध्ये आवश्यक त्या ठिकाणी गीत आणि संगीताचा वापर चपखलपणे केलेला आढळतो. संगीत, नृत्य आणि नाट्य यांच्या मिलनातून त्यांच्या नाटकांचा एक आगळावेगळा अविष्कार आपल्याला बघायला मिळतो. त्यामुळे त्यांनी पारंपारिक नाटकांची चौकटच बदलून टाकली. रंगभूमीला एक नवीन ऊर्जा आणि नवीन रूप दिले. काही नाटकांचे विषय ऐतिहासिक, पौराणिक किंवा तत्कालीन असले तरी त्यांनी त्यांना आधुनिक परिस्थितीचा संदर्भ दिला असल्यामुळे ही नाटके कधीच जुनी होत नाहीत. ती चिरतरुण वाटतात. आजही त्यांच्या नाटकांचे बंगालमध्ये आणि बंगालच्या बाहेरही प्रयोग होत असतात त्याचे रहस्य हेच आहे.

रवींद्रनाथांनी नाटकांचे सर्व प्रकार हाताळले. त्यात नृत्यनाटिका, एकांकिका, प्रहसने, सांगितिका यासारख्या अनेक प्रकारांचा समावेश आहे. रवींद्रनाथांच्या जीवनकालात भारतीय नाटकांना घरघर लागली होती, नाट्य संस्कृती लयास चालली होती. अशा नाट्य संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. रवींद्रनाथांनी इंग्रजी नाटके पाहिली आणि अभ्यासली होती. इंग्रजी साहित्याचा अभ्यास केला होता. तसेच भारतीय साहित्य, वेद, शास्त्र, पुराणे आदींचेही वाचन केले होते. त्यांच्या अभ्यासातून, विचारमंथनातून, चिंतनातून पारंपारिक नाटकांचे स्वरूप बदलून टाकणारी नवीन नाटके जन्माला आली. प्रयोगशील आणि स्वयंभू रंगभूमीचा जन्म झाला. रवींद्रनाथांच्या नाटकांमध्ये देशी, विदेशी, पारंपारिक अशा सर्व प्रकारच्या चांगल्या गोष्टींचा मिलाफ झालेला आपल्याला दिसतो. त्यांची नाटके विचारांना नवी दिशा देतात, समाजाला प्रगतीच्या दृष्टीने मार्गदर्शन करतात, राष्ट्रभक्ती निर्माण करतात हे त्यांच्या नाटकांचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

रवींद्रनाथांचा मूळ पिंड हा कलाकाराचा होता. साहित्य निर्मिती करताना रसिकांच्या मनाचा ठाव घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती. त्यामुळे एक नाटककार म्हणून प्रेक्षकांना काय हवे आहे किंवा त्यांना काय दिले पाहिजे त्याची उत्तम जाणीव त्यांच्या ठायी होती. त्यातून ते कवी असल्यामुळे त्यांच्या नाटकांचे सौंदर्य वाढले तर ते उत्तम कथाकार आणि कादंबरीकार असल्यामुळे त्यांची नाटके आशयसंपन्न झाली.



## जात्यावरच्या ओव्या......


**नातेसंबंध : पती-पत्नी**

भराताराचं सुख
मी तर सांगीन गोतात
चंदन शेल्याची
केली सावली शेतात ||६१||

वाटच्या वाटसरा
नको अडवू माझा घोडा
कंथ (पती) माझा जंगलात
मोजे वाघिणीच्या दाढा ||६२||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## फुलमाला....



**गुलमोहर...**

अग्निफुले ही जणू फुललेली
गुलमोहर हा दिसतो सुंदर
तप्त उन्हातही देई गारवा
मनास माझ्या मोहवी निरंतर

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज

# चित्त जेथे भयशून्य


**ज्योतिर्मय साहित्य**

रवींद्रनाथ टागोर यांचे शालेय शिक्षणातील अनुभव, त्यावर केलेले चिंतन, समाजातील आणि घरातील वेगवेगळ्या लोकांशी केलेली चर्चा, विशेषतः भावंडाशी केलेली चर्चा या साऱ्यांचा सर्जनशील व्यापकपणा त्यांच्यावर पडलेला होता. जीवनाशी समर्थपणे सामना करून मानवतेची मूल्य रुजवायला जे शिकवत तेच खरं शिक्षण असे ठाम मत त्यांचे होते.' आपल्या बालपणी शाळेत न जावे असे वाटणारी शाळा. तेथील असलेले तुरुंगासारखे वातावरण. गंभीर आणि उदासीन परिसर आणि तशाच पद्धतीचे चैत्यनहीन वृत्तीचे शिक्षक हे त्यांना कायमच पुढील आयुष्यात जाणवत राहिले. याबरोबरच विद्यार्थी जसे काही कैदीच आहेत असे समजून त्यांच्यासाठी टोकाची शिस्त ही त्यांना आयुष्यभर बोचत असे. रवींद्रनाथ टागोर त्यांच्या शाळकरी वयातील आठवणी सांगताना म्हणतात.... दररोज वर्ग सुरू होण्यापूर्वी आम्ही एकत्र जमून, मंत्र म्हटल्याप्रमाणे काहीतरी एका सुरात गात असू. दैनंदिन कार्यक्रमाला सुरवात करण्यापूर्वी वातावरण उल्हासित करण्याचा कदाचित तो प्रयत्न असावा. इंग्रजी भाषा आणि परकीय स्वररचना यांमुळे गीताचा अर्थ अनाकलनीय असल्याने आम्हांला उल्हासित वाटण्याऐवजी दिवसाच्या सुरवातीलाच आमचा नैसर्गिक उत्साह पूर्णपणे मावळत असे.विद्यार्थी उदास का ?, याचा शोध घेण्याची शिक्षकांना कधी गरजच वाटली नाही. नाजूक फुलांवर उंचावरून होणाऱ्या गारांच्या जोरदार मा-याप्रमाणे दिवसभर आमच्या कोमल आणि चिमुकल्या मनांवर धड्यांचा मारा होत असे. असे कंटाळवाणं वातावरण अनुभवल्याने मला शाळेचा तिटकारा वाटू लागला.' 'शालेय शिक्षण हा एक कलाहीन, चैतन्यहीन अशा शिक्षणाचा कारखाना आहे. त्याचा भोवतालच्या विश्वाशी काडीमात्र संबंध नाही. सकाळी साडेदहाला शाळा सुरु झाली की, शिक्षकांचं अगम्य, रूक्ष आणि यांत्रिक पध्दतीने शिकवणं आम्हाला दुपारी साडेचार वाजता शाळा सुटेपर्यंत ऐकत बसावं लागे. अशा शिक्षणपध्दतीत खऱ्या ज्ञानापासून वंचित राहिलेल्या मुलांची सुटका रवींद्रनाथ टागोर यांना करायची होती. शालेय शिक्षण घेताना त्यांनी स्वतः जे सोसलं होतं ते या मुलांना अनुभवावं लागू नये, असे त्यांना वाटे. रवींद्रनाथ लहान मुलांच्या पातळीवर जाऊन विचार करू शकत असल्याने, त्यांना कोवळ्या मुलांचं मन कळत असे.

रविंद्रनाथ टागोर यांनी १९०० साली बंगाली भाषेत चित्त जेथे भयशून्य ही कविता लिहिली, जेंव्हा भारत ब्रिटीश सत्तेखाली होता. भारत तत्कालीन काळात धार्मिक, सामाजिक आणि वर्गीय भेदभाव, अंधश्रध्दा आणि गुलामी यांचं अस्तित्व होतं. टागोर यांची 'प्रार्थना' म्हणून शिर्षक असलेली ही कविता प्रथमतः 'नैवेद्य' या बंगाली नियतकालिकात १९०१ मध्ये प्रसिद्ध झाली. या कवितेच्या माध्यमातून त्यांनी एका बौद्धिक आणि आत्मसन्मानी शिक्षीत भारतीयांच स्वप्न मांडल. या कवितेचा मराठी भावानुवाद.....

जिथे मन भयमुक्त आहे आणि मस्तक उंच आहे;
जिथे ज्ञान सर्वांसाठी मुक्त आहे;
जिथे जग संकुचित घरगुती भिंतींनी तुकड्यांमध्ये विभागलेले नाही;
जिथे शब्द सत्याच्या गर्भातून येतात;
जिथे अथक प्रयत्न पूर्णत्वाच्या दिशेने हात पुढे करतात,
जिथे विचारांचा निर्मळ झरा
सवयीच्या मृत वाळवंटात हरवलेला नाही,
जिथे तुझ्या मार्गदर्शनाखाली
मन सतत विस्तारित विचार आणि कृतीकडे नेतं.
त्या स्वातंत्र्याच्या स्वर्गात, पिता, माझ्या देशाला जागृत होऊ दे.

ब्रिटीश राजवटीच्या काळात लिहिलेल्या या कवितेत भारताच्या शैक्षणिक, बौद्धिक, सामाजिक आणि राजकीय मुक्ततेसाठी केलेली एक भावपूर्ण प्रार्थना आहे. ही कविता मानसिक स्वातंत्र्याची मागणी करते. विचारमंथनातून रवींद्रनाथ टागोर यांना वाटलं की, बंगालमधील प्रचलित शिक्षणपध्दतीमध्ये जेंव्हा बदल होतील तेंव्हा होतील, पण तोपर्यंत आपणच एखादी शाळा स्थापन करून शिक्षणाबद्दलच्या आपल्या कल्पना अमलात आणाव्यात. या शाळेला सरकार आर्थिक मदत करणार नाही हे उघडच होतं. पण चुकून केलीच तर सरकारचे जाचक नियम आपल्याला पटणार नाहीत, याची रवींद्रनाथाना पुरेपुर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी सरकारी अर्थसहाय्य न घेता, स्वतःचे पैसे घालून, आणि काही धनिकाकडून देणग्या स्वीकारून खाजगी शाळा स्थापन करण्याचा विचार पक्का करीत शांतिनिकेतन चा परिसर निवडून या शाळेला शांतिनिकेतन विद्यालय हे नाव द्यायचं ठरवलं. देवेंद्रनाथांनी २२ डिसेंबर १८४३ या दिवशी ब्राम्हो साधनेची दीक्षा घेतली होती, रवींद्रनाथांनी याच तारखेचा मुहूर्त साधून २२ डिसेंबर १९०१ या दिवशी शांतिनिकेतन इथे विद्यालय सुरू केलं. रवींद्रनाथ म्हणतात, मुलांना जितकं स्वातंत्र्य आणि मोकळेपणा द्याल तितकी ती प्रफुल्लीत होतील. त्यांच्या बुद्धीचा आणि जीवनदृष्टीचा विकास त्यातूनच होईल. मुलांची मनं भोवतालच्या वातावरणाविषयी पराकाष्ठेची जागृत असतात. आपल्या ज्ञानेंद्रियामार्फत होणाऱ्या सुक्ष्म संवेदनाही ती अचूक टिपुन घेतात. मुलांना निसर्गाबद्दल वाटणाऱ्या ओढीला पायबंद घालण्याचा प्रयत्न न करता त्यांना निसर्गाच्या निकट सहवासाची संधी मिळायला हवी. आणि त्यांनी शांतिनिकेतन च्या माध्यमातून ती निर्माण करून दिली. जगामध्ये शैक्षणिक पॅटर्न म्हणून शांतिनिकेतनचे नाव घेतले जाते आणि तशा प्रकारचे वातावरणामध्ये शाळा, कॉलेज, युनिव्हर्सिटी यांची निर्मिती केली जाते. व्यावसायिक शैक्षणिक बज बजपुरीमध्ये पुन्हा अशा प्रकारच्या शाळांची निर्मीतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. थोर शिक्षणतज्ञ, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मनोमापनशास्त्रज्ञ तसेच भारतीय शैक्षणिक तंत्रविज्ञानाचे जनक डॉ. शरदचंद्र कुलकर्णी यांची जन्मशताब्दी ७ मे पासून सुरु होत आहे. त्यांनी १९४९ चे त्यांचे उदाहरण दिले आहे. पुणे विश्वविद्यालयाच्या एम.ए.चा रिझल्ट लागण्यापूर्वी त्यांची नेमणूक अहमदनगरच्या कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून झाली. वर्गात गेल्यावर त्यांच्या लक्षात आले की वर्ग लहान आहे. केवळ १०-१५ च विद्यार्थी आहेत. ते सारे त्यांच्यापेक्षा वयाने मोठे आणि नोकरी करत असलेले. त्यांना शिकवायचे काय आणि कसे? मग त्यांनी ठरवले,विद्यार्थ्यांना कमी लेखायचे नाही. त्यांना सहकारी मानायचे. विद्यापीठाने नेमलेली पुस्तके आपण वाचून काढायची पण त्यातला आशय पाठशाळेप्रमाणे व्याख्यान देऊन न शिकवता चर्चा करून गटागटाने समजाऊन देण्याचा प्रयत्न करायचा. कारण या पध्दतीत विद्यार्थ्यांच्या विचाराला पूर्ण वाव होता. आणि त्यात ते यशस्वी झाले. हेच शांतिनिकेतन करते. ज्या रवींद्रनाथ टागोर यांनी अशा शिक्षणपद्धतीचा पाया घातला.






शिरीष चिटणीस

१९११ मध्ये ''चित्त जेथे भयशून्य'' या बंगाली कवितेचा अनुवाद इंग्रजीमध्ये स्वतः रवींद्रनाथ टागोर यांनी मूळ भावनांचा गाभा कायम ठेवत केला. त्यांच्या गीतांजली या इंग्रजी कवितासंग्रहात ही कविता ३५ व्या नंबरवर आहे. गीतांजली साठी त्यांना १९१३ मध्ये साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला.

भारतात स्वातंत्र्य चळवळीतील महात्मा गांधी, पंडीत नेहरू स्वतः रविंद्रनाथ टागोर यांच्यासह अनेकांनी ही कविता आपल्या विचारसरणीत महत्वाची मानली. ही कविता भारतातील मानवी मूल्यांचा आरसाच ठरली आहे. अनेक भाषांमध्ये तिचे भाषांतर झाले असून, ती जगभरात वाचली जाते. स्वातंत्र्यानंतर ही कविता भारतीय मूल्यव्यवस्थेचं प्रतीक मानली जाते. नेहरूंनी डिस्कव्हरी ऑफ इंडिया या पुस्तकात या कवितेचा संदर्भ दिला आहे. शालेय अभ्यासक्रमातील कविता आजही प्रेरणादायी साहित्य म्हणून समाविष्ट आहे.

****

# नशीब बलवत्तर म्हणून....

१९७८ ते १९८२ या कालावधीत मी नौदलातील खडतर बेसिक ट्रेनिंगसह चार वर्षाचा डिप्लोमा (डिप्लोमा in Naval Architecture and shipBuilding ) पूर्ण केला. डिप्लोमा पूर्ण झाल्यानंतर मला प्रॅक्टिकल ट्रेनिंग साठी आयएनएस ब्रह्मपुत्र या युद्धनौकेवर पाठवण्यात आले. मी ब्रह्मपुत्र या युद्धनौकेवर खूप काम केले कारण मी नौदलातील सर्वात छोट्या रँकचा नौसैनिक होतो. जूनियर होतो. वरिष्ठ सांगतील ते काम करावे लागत होते.

आय एन एस ब्रह्मपुत्र या जहाजावर सेवारत असताना मला श्रीलंका, मलेशिया, मालदीव या देशांना भेट देण्याचा आणि तेथील शहरे पाहण्याचा योग आला . खरंच एका वर्षात तीन तीन देशांच्या दौऱ्यावर जाणे हा माझ्या नशिबाचाच भाग होता.

१९८३ मध्ये माझी बदली मुंबई स्थित रशियन बनावटीची अत्याधुनिक युद्धनौका आयएनएस राणा यावर करण्यात आली. त्यावेळी माझे जहाज नौसेना गोदी नेवल डॉकयार्ड मुंबई येथे दुरुस्तीसाठी आले होते जहाजावर माझे मुख्य काम जहाजाची तपासणी करणे आणि ते दुरुस्त करून घेणे तसेच जहाज वॉटर टाईट , एअर टाईट ठेवणे , जहाजाचे अँकर अँड केबल यांची दुरुस्ती, मेंटनन्स करणे हे होते. जहाजाची बाहेरून आणि आतून दुरुस्ती, इंजिनची दुरुस्ती, इलेक्ट्रिकल इक्विपमेंटची दुरुस्ती, गण मेंटेनन्स ही सर्व कामे जहाज गोदी मध्ये असताना केली जातात. त्याला सहा महिन्याचा कालावधी लागतो. जहाजाची पूर्ण दुरुस्ती आणि रंगरंगोटी नंतर ट्रायल्स यशस्वीरित्या झाल्याशिवाय जहाजाला समुद्रात सेलिंग वर किंवा मिशनवर पाठवले जात नाही.

आयएनएस राणा या जहाजावर अधिकारी आणि नौसैनिक मिळून दिडशे लोक होते. जहाज नवीन आणि अत्याधुनिक असल्याने वरचेवर सेलिंग वर पाठवले जात असे आमचे जहाज आता पूर्णपणे ऑपरेशनल झाले होते. सर्व चाचण्या यशस्वीरित्या पार पडल्या होत्या.

१९८३ सालचा जुलै महिना होता एका गुप्त मिशनसाठी आम्हाला प्रथम विशाखापट्टनम आणि नंतर गुजरातला जायचे होते. मात्र याची आम्हा कोणालाही काडीमात्र कल्पना नव्हती. एक दिवस अचानक रात्री नऊ वाजता आम्हाला नेवल हेडकॉटर कडून शॉर्ट नोटीस मध्ये विशाखापट्टणमसाठी सेल करण्याचे आदेश मिळाले. त्याप्रमाणे आम्ही रात्री दोन वाजता विशाखापटनम साठी निघालो. या प्रवासादरम्यान युद्धाची प्रात्यक्षिके जसे गन फायरिंग , मिसाईल फायरिंग, इमर्जन्सी ड्रिल्स, शत्रूच्या युद्धनौके कडून क्षेपणास्त्र आपल्या दिशेने लागले तर ते रडार वरती दिसते का ? जहाजाच्या गणव्दारे ते उध्वस्त करणे, जहाजावर शत्रू कडून अचानक हल्ला झाला तर प्रत्येकाने आपल्या ॲक्शन स्टेशनवर त्वरित कसे पोहोचायचे अशी अनेक प्रात्यक्षिके केली जातात. ही प्रात्यक्षिके समुद्रात प्रवासादरम्यान चालूच असतात युद्धजन्य परिस्थितीमध्ये आपले ॲक्शन स्टेशन कोणालाही सोडता येत नाही तेथे पॅक लंच, बॅक डिनर जागेवरच पोहोचवले जाते. कधी कधी दिवस रात्रही प्रात्यक्षिके सुरू असतात अशावेळी पोटभर निवांत जेवण , आंघोळ झोप हे विसरावेच लागते.

मुंबईहून निघून आम्ही दोन दिवसांनी गोवा हार्बर ला पिण्याचे पाणी, तेल आणि आवश्यक खाण्यापिण्याच्या गोष्टी घेण्यासाठी थांबलो. तिसऱ्या दिवशी आम्ही गोव्याहून विशाखापट्टणम साठी निघालो.खूप पाऊस होता. तसेच जोराचा वारा असल्याने समुद्र खूपच खवळला होता. आमचे जहाज खूपच रोलिंग आणि पिचींग करत होते. जूनचा महिना असल्याने हळूहळू समुद्र खूपच आवळत चालला होता. जहाज सारखे हलत होते. कारण समुद्राच्या लाटा वेगाने येऊन जहाजावर धडकत होत्या. अशावेळी कोणतेच काम धडपणे करता येत नाही. साधे चालायचे जरी झाले तरी कशाचा तरी आधार घेऊन चालावे लागते. जेवण करताना ताट गच्च धरूनच खावे लागते. बऱ्याच लोकांना उलट्या होतात.



रवींद्र राऊत
निवृत्त मास्टर चीफ पेटी
ऑफिसर क्लास वन

आम्ही श्रीलंकेच्या जवळ बंगालच्या उपसागर मधून निघालो होतो. नेहमीप्रमाणे समुद्र खूपच खवळलेला होता. जहाजही खुपचं हलत होते. अचानक माझ्या नावाची घोषणा मेन ब्रॉडकास्ट वर झाली. मास्टरजी रवी राऊत ताबडतोब ब्रिजवर या! मी त्वरित ब्रिजवर गेलो . तेथे आमच्या जहाजाचे कमांडिंग ऑफिसर कमांडर कुट्टी डेप्युटी कमांडर सिन्हा, नेवीगेशन ऑफिसर हे सर्व उपस्थित होते. कॅप्टन साहेबांनी मला सांगितले की पोर्ट साइडच्या म्हणजे (जहाजाची उजवी बाजू) शेवटच्या दरवाजातून समुद्राचे पाणी येत आहे. ते दुरुस्त करणे गरजेचे आहे. मी आवश्यक तेवढे हेल्पिंग हँड्स घेऊन त्या दरवाजाजवळ हळूहळू पोहोचलो. पाहिले तर दरवाजातून मोठ्या प्रमाणात समुद्राचे पाणी जहाजामध्ये येत होते .मी दरवाजाचे निरीक्षण केले, दरवाज्याची क्लोजिंग मेकॅनिझम खराब झाली होती ती दुरुस्त करण्याची जबाबदारी माझी होती . हे काम करणे खूपच गरजेचे होते जर दरवाजा दुरुस्त झाला नाही तर समुद्रातील लाटांच्या प्रेशरने दरवाजा तुटण्याची भीती होती. दरवाजा तुटला तर समुद्राचे पाणी जहाजामध्ये आत आले असते आणि मोठी दुर्घटना होण्याची शक्यता होती. त्यामुळे मला कोणत्याही परिस्थितीमध्ये तो दरवाजा दुरुस्त करणे गरजेचे होते कारण जहाजाचे दरवाजे खिडक्या यांची वॉटर टाईट इंटिग्रिटी मेंटेन करणे ही माझी जबाबदारी होती. जहाज खूपच हलत होते.मी स्वतःला एका दोरीने बांधले.माझ्या सोबत जे मदतनीस होते त्यांना घट्ट पकडायला सांगून मी दरवाजा दुरुस्त करू लागलो.मी तो लोखंडी दरवाजा. थोडा उघडला तोच एक मोठी लाट येऊन दरवाज्यावर आदळली.त्याच बरोबर दरवाजा उघडला व मी लाटेबरोबर जहाजाच्या डेकवर दहा - बारा फुट फेकलो गेलो.मी पूर्णपणे समुद्राच्या पाण्याने भिजलो होतो. माझ्या हाताला, गुडघ्याला लागले होते. तरीही न घाबरता मी जहाजाच्या रेलिंगला धरून दोन्ही पायावर रांगत रांगत हळू हळू पुन्हा जहाजात आलो. मी आणि माझे मदतनीस पुन्हा दरवाजा घट्ट पकडून तो दुरुस्त केला.आता दरवाज्यातून थोडे सुद्धा पाणी येत नव्हते.मला मार लागल्याचे माझे काम संपल्यावरच समजले.तो पर्यंत कसेही करून काहीही झाले तरी दरवाजा दुरुस्त कारायचाच हेच डोक्यात होते. कारण हे काम झाले नसते तर संपूर्ण जहाजास धोका होता. दरवाजा दुरुस्त झाला याचा आम्हा सर्वांना आनंद होता. मी ब्रिजवर जाऊन दरवाजा दुरुस्त केला असल्याचा रिपोर्ट कॅप्टन साहेबाना दिला. सगळे खूप खुश झाले. सगळ्यांनी मला आणि माझ्या टीमचे अभिनंदन केले.तो पर्यंत मला हाताला आणि पायाला लागल्यामुळे खूप त्रास होत होता.मी लगेच डिस्पेन्सरी मध्ये गेलो . डॉक्टरांनी माझ्यावर उपचार केले आणि ॲडमिट करून घेतले. मी ॲडमिट झाल्याचे कॅप्टन साहेबाना समजले तेव्हा सगळा स्टाफ मला पाहायला माझ्या तब्बेतीची चौकशी करायला आले. माझ्या या जीवावर उदार होऊन केलेल्या कामामुळे जहाजातील लोकांचा जीव वाचला होता म्हणून मला या कामासाठी . कॅप्टन साहेबांनी ''commendation and proficiency '' हा अवॉर्ड देऊन माझा गौरव केला.

आज ही तो प्रसंग आठवला की अंगावर शहारे येतात. नशीब बलवत्तर होते .म्हणून मारता मारता वाचलो.

'महापर्यटन उत्सव-२०२५' चा समारोप

# पर्यटनाला चालना देण्यासाठी वर्षभराचे पर्यटन कॅलेंडर तयार करा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**सातारा** – पर्यटन विकासासाठी पर्यटन विभागाने वर्षभरातील पर्यटनाचे वेळापत्रक तयार करून त्यात राज्याच्या विविध भागात वर्षभरात आयोजित उत्सव सोहळ्यांचा समावेश करावा. यासोबतच देशातील टूर ऑपरेटर्स सोबत कार्यशाळा घेऊन त्यांना इथल्या पर्यटन सुविधांची माहिती द्यावी. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून एकाच पोर्टलवर सर्व पर्यटन सुविधांची माहिती सर्वांसाठी उपलब्ध करुन द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ द्वारा महाबळेश्वर येथे आयोजित 'महापर्यटन उत्सव-२०२५'चा शानदार समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला.

कार्यक्रमाला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव (पाटील),आमदार डॉ. अतुल भोसले, आमदार सचिन पाटील, आदी उपस्थित होते.

पर्यटन महोत्सवला उत्तम प्रतिसाद




मिळाल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करून मुख्यमंत्र देवेंद्र फडणवीस म्हणाले, पर्यटन वाढीसाठी नागरी सुविधा आणि पर्यटन संस्कृती विकसित करणे गरजेचे आहे. पर्यटन संस्कृती विकसित करुन स्थानिकांचे सहकार्य पर्यटकांना सुखद अनुभव येण्यासाठी महत्वाचे आहे. शौर्य आणि निसर्ग सौंदर्याचा सुंदर मिलाफ महाबळेश्वर येथे पाहायला मिळतो. निसर्गाने सुंदर पश्चिम घाट आपल्याला दिला आहे, ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा दिला आहे, अनेक सुंदर, पवित्र तीर्थक्षेत्रे आपल्याकडे आहेत, हे सौंदर्य देश-परदेशात पोहोचविण्याचे काम आपल्याला करायचे आहे आणि हा महोत्सव त्यादृष्टीने महत्वाचा आहे.

महाबळेश्वर हे देशातील सर्वोत्तम पर्यटनस्थळ असून त्याचे मोठ्या प्रमाणात मार्केटिंग करण्याची गरज आहे. महाबळेश्वर हे नवे गिरीस्थान म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. पर्यटनाच्या क्षेत्रातील स्कुबा डायव्हिंगसारख्या नव्या कल्पना पुढे आणून राज्यातील पर्यटनाला चालना देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. कोयना बॅकवॉटर संबंधी असणारी बंधने दूर केल्याने तेथे चांगली पर्यटन व्यवस्था उभी राहत आहे. पुढील महापर्यटन उत्सव कोयना बॅकवॉटर क्षेत्रात घेण्यात येईल व पर्यटकांना या भागातील निसर्ग सौंदर्याचा आणि जल क्रीडांचा अनुभव घडविण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक आल्यावर रोजगार निर्माण होतात, मात्र पर्यटन क्षेत्रात कमी गुंतवणूकीत अधिक रोजगार निर्माण होतात. मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याची क्षमता या व्यवसायात आहे. पर्यटन क्षेत्रात पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर येण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. राज्याला पर्यटन क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आणण्याचे कार्य पुढील ५ वर्षात करण्यात येईल.

मुंबई येथे आयोजित वेव्हज् परिषदेमुळे क्रिएटर्स इकॉनॉमिमध्ये महाराष्ट्र महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करताना आपल्या सांस्कृतिक विविधता कंटेन्ट क्रिएटर्सच्या माध्यमातून जगभरात पोहोचविण्याचे प्रयत्न व्हावेत. पर्यटकाला स्थानिक वैशिष्ठ्याचा परिचय करून दिल्यास पर्यटक त्या त्या भागाकडे वळेल आणि पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, महाबळेश्वर निसर्गाने समृद्ध असून पर्यटनाची अमर्याद क्षमता इथे आहे. मुनावळे येथे जलपर्यटनालाही चांगला प्रतिसाद मिळतो आहे. पर्यटकांना इथल्या निसर्गासोबत इथल्या कला, संस्कृती, इतिहास आणि खाद्यपदार्थांचा आनंद घेता येईल. इथल्या भूमीपुत्राला पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होईल आणि आपल्या कुटुंबासोबत भूमातेची सेवा करण्याची संधी मिळेल. तीन दिवसात महोत्सवला पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यटन महोत्सवाच्या माध्यमातून इथल्या पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




# नारंगी अर्थव्यवस्थेचे सुवर्णयुग : वेव्ह शिखर परिषदेचे प्रमेय

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**
**(मागील अंकावरून)**

भारताला जागतिक प्रतिभेचे व्यासपीठ बनविण्याची क्षमता वेव्हज्मध्ये आहे. भारतीय खानपानाप्रमाणेच गायनही जागतिक पातळीवर लोकप्रिय होईल आणि संगीताच्या माध्यमातून नवी जादू घडू शकेल. स्क्रीनचा आकार लहान होत चालला असला तरी भारतीय कथाकथनाचा संदेश मात्र मोठा होत आहे. जगभरातील स्टार्टअप उद्योग नेते आणि धोरण नियोजक एका व्यासपीठावर येत आहेत हा मोठा चमत्कार आहे. हे व्यासपीठ मनोरंजन आणि नवउपक्रमाचे एक केंद्र ठरावे अशी अपेक्षा आहे.

भारतीय मनोरंजन सिद्धांतः

पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी वेव्ह शिखर परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी १ मे रोजी मुंबईत केलेल्या भाषणामध्ये भारतीय मनोरंजन सिद्धांताचा परामर्श घेतला. त्यांनी आपल्या भाषणामध्ये भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील मनोरंजन सिद्धांताची मांडणी केली आणि प्रतिपादन केले की, सबंध जगामध्ये कला, संस्कृती आणि मनोरंजनाचा एवढा प्रगल्भ विचार जगामध्ये कोणीही केलेला नव्हता. प्राचीन काळातील भारतीय संस्कृतीच्या सभ्यतेचे श्रेष्ठत्व संस्कृत रंगभूमीमध्ये आहे. कालिदासांच्या अभिज्ञान शाकुंतल, मेघदूत इत्यादी नाटकांचा विशेष उल्लेख करून त्यांनी भारतातील श्रेष्ठ मनोरंजन परंपरेचे महत्त्व सांगितले. कला हे भावभावनांच्या प्रकटीकरणाचे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे आणि या माध्यमाच्या शास्त्रीय विकासातून मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचा कसा परिपूर्ण विकास होतो हे त्यांनी सूत्ररूपाने सांगितले. ही परिषद सबंध जगामध्ये अशा प्रकारची पहिलीच परिषद आहे. जगाच्या शंभर देशांतील प्रतिनिधी या बैठकीसाठी उपस्थित होते. या शिखर परिषदेतील विचारमंथन प्रामुख्याने मनोरंजन उद्योगातील अनेक समस्यांची उकल करण्यासाठी पूरक आणि प्रेरक ठरले आहे. मनोरंजन क्षेत्रात उद्यमशीलता आहे. कलात्मकता आहे. कल्पकता आणि उद्यमशीलता दोघांनाही एकत्र आणण्याचा प्रयत्न या शिखर परिषदेत करण्यात आला आहे. भारतीय तरुणांमध्ये असलेल्या कल्पकतेला सबंध विश्वाच्या मनोरंजन उद्योगाची भव्य क्षितीजे उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे कार्य या परिषदेमुळे शक्य झाले आहे. सर्जनशीलता हा सर्व कलांचा आत्मा आहे. भारतामध्ये मुंबईत प्रथम दादासाहेब फाळके यांनी ३ मे १९१३ रोजी 'राजा हरिश्चंद्र' या पहिल्या चित्रपटाची निर्मिती केली. गेल्या १०० वर्षात या चित्रपट उद्योगाचा विस्तार एखाद्या वटवृक्षाप्रमाणे झाला आहे आणि भारत जगातील पहिल्या क्रमांकाचा चित्रपट निर्मिती करणारा देश बनला आहे. तेव्हा चित्रपट असो, नाटक असो, रंगभूमी असो किंवा भारतीयांची कथाकथनाची परंपरा असो त्यात भारत अग्रेसर आहे. प्राचीन काळापासून कथाकथनाच्या अनेक आयामांचा विकास भारतीयांनी केला आहे. आता त्याच्या प्रगल्भतेचे प्रतिबिंब चित्रपट उद्योगात उमटले आहे. त्यामुळे भविष्यकाळात या चित्रपट उद्योगाला आणखी नव्या दिशेने विकसित करण्याची गरज आहे. सबंध जगाच्या मनोरंजन गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्या कलात्मक अभिव्यक्तीचा दर्जा अधिक श्रेष्ठ आणि अधिक गुणवत्तेवर आधारलेला कसा विकसित करता येईल, यावर भर देण्याची गरज आहे. वेव्ह या माध्यमातून भविष्यात निर्माण होणार्या व्यावसायिक संधींवर आता लक्ष केंद्रित केले पाहिजे. स्टार्टअप क्षेत्रात भारत जगात दुसर्या क्रमांकावर आहे. मनोरंजन क्षेत्रात स्टार्टअपची भक्कम उभारणी करून तरुणांनी एक पाऊल पुढे टाकले पाहिजे.

चंदेरी दुनियेतले चांदणेः

भारत ही चित्रपट व्यवसायाच्यादृष्टीने स्वर्गभूमी बनली आहे आणि भारतीय चित्रपट जगातील १०० देशात पोहोचले आहेत. हे यश एका शिखरावर नेणारे आहे. भारतीय चित्रपटांचा इतिहास दादासाहेब फाळके यांच्यापासून अमिताभ बच्चन यांच्यापर्यंत मोठा समृद्ध आणि संपन्न आहे. दादासाहेब फाळके यांनी घरदार व सोन्याचे अलंकार विकून समर्पित भावनेने भारतीय चित्रपट सृष्टीची मुहूर्तमेढ रोवली. चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या जयंतीच्या उत्तर रात्रीनंतर ही परिषद संपन्न होत आहे. हा एक विलक्षण योगायोग आहे. त्यात या पुण्यात्म्याचे योगसामर्थ्य दडले आहे. गेल्या शतकातील गतिशील वाटचाल पाहता, भारतीय चित्रपटांनी बजावलेली कामगिरी सोनेरी झळाळी व चंदेरी झलक दर्शविणारी आहे. चित्रपटांनी भारतीय संस्कृतीचे धार आणि सार जगाच्या कानाकोपर्यात पोहोचविले आहे. रशियात राजकपूर यांनी लोकप्रियतेचे शिखर गाठले. त्यांचा 'मेरा नाम जोकर' येथील सांस्कृतिक जीवनाचे प्रतिक बनला. मेरा नाम जोकर प्रमाणेच रशियामध्ये आवारा, संगम, राम तेरी गंगा मैली, बॉबी हे चित्रपट कमालीचे लोकप्रिय ठरले होते. सामाजिक वास्तवाचे इंद्रधनुष्य फुलविणारे सत्यजित रे यांचे चित्रपट कान्स महोत्सवात लक्ष वेधून घेणारे ठरले. त्यांच्या पाथेरपांचालीने जगभरात लौकीक संपादन केला. पंतप्रधानांनी आरआरआर (रौद्रम रणम रुधिराम) यांच्या ऑस्कर विजेत्या विक्रमावर प्रकाश टाकला. गुरुदत्त यांचे चित्रपट म्हणजे सिनेमाच्या माध्यमातील जणू जिवंत काव्यच होते. त्यांच्या काव्यात्मक भावनांची कारंजी चित्रपटाच्या माध्यमातून उसळली. भारतीय जीवनातील कथा आणि व्यथांना आकार देणार्या या प्रतिभाशाली चित्रपट निर्मात्यांची कितीतरी उदाहरणे सांगता येतील. ऋत्विक घटक यांनी चित्रपटात प्रकट केलेले सामाजिक प्रतिबिंब विलक्षण हृदयस्पर्शी ठरले. तसेच ए. आर. रहमान यांचे अव्वल अभिजात भारतीय संगीत यशशिखरावर पोहोचले. एस. एस. राजामौली यांच्या महाकाव्य कथानकाची प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. चित्रपटाच्या माध्यमातून प्रत्येक कथाकाराने भारतीय संस्कृतीचे सार जगातील लाखो बांधवांच्या मनात आणि कानात पोहोचविले आहे. 'हृदयी हृदय येक जाहले । ये हृदयीचे ते हृदयी घातले।' असा हा आध्यात्मिक संवाद म्हटला पाहिजे.

नवोन्मेशाली अंतर्दृष्टीः

भारतीय कलाकार म्हणजे प्रतिभेचा सोनचाफा आहे. त्यांची नवोन्मेष अंतर्दृष्टी कुठल्याही कला माध्यमात एका नव्या उंचीवर घेऊन जाते. मग ते क्षेत्र गेमिंगचे असो, शास्त्रीय व भावसंगीताचे असो, लोकसंगीताचे असो किंवा चित्रपट निर्मिती, फॅशन आणि अभिनयाचे असो उच्च दर्जाची व्यावसायिकता आणि श्रेष्ठ गुणवत्ता या आधारेच हे यशशिखर गाठणे भारतीय कलावंतांना शक्य झाले आहे. सर्जनशीलतेची प्रक्रिया चित्रपटाच्या माध्यमातून उंचीवर नेत असताना नव्या कल्पना समाजाच्या खोल अंतरहृदयापर्यंत पोहोचविण्याची ही अंतर्दृष्टी महत्त्वाची आहे. 'वैष्णव जन तो तेणे कहिये जे । पीड परायी जाणे रे' या नरसी मेहता यांनी ५००-६०० वर्षांपूर्वी लिहिलेल्या काव्याचा अर्थ मोठा बोलका आहे. महात्मा गांधींच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने जगातील १५० कलावंतांनी एकत्र येऊन हे गाणे म्हटले त्यामुळे हृदयाची तार छेडली गेली. जगातील कलावंतांनी एकत्र येऊन आपल्या सामुदायिक भावनांच्या प्रकटीकरणातून हे गीत साकार केले. आता ह्या ऐक्यभावाचे पुन्हा एकदा वेव्हच्या रुपाने प्रकटीकरण व जागरण होत आहे. सामुदायिक सहकार्य आणि अद्भुत प्रतिभाशक्ती यांचा संगम वेव्हच्या रुपाने पुन्हा एकदा प्रकटत आहे ही गोष्ट अधोरेखित केली पाहिजे. ही वैश्विक दृष्टी आता नव्या लाटांच्या स्वरुपात प्रतिबिंबित होत आहे. दुसर्यांची दुःखे जाणणारा तोच खरा वैष्णव, तोच खरा साधू ही नरसी मेहतांची भावना महात्मा गांधींनी जोपासली आणि जगातील दुःखी कष्टी लोकांचे अश्रू पुसले. त्याच भावनेने वेव्ह परिषद नव्या जगाची सुखदुःखे पुसत आहे आणि गोर गरीब देशातील लोकांच्या भावनांना आकार देत आहे.

नवे अंगाई गीतः

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिभाशक्ती अद्भुत आहे. त्यांनी मानवी मनात खोलवर रुजलेल्या सर्जनशीलतेचे प्रतिबिंब अंगाई गीतातून प्रकट होते हे अद्भुतपणे सांगितले. बालकांना धुनी आणि संगिताचा पहिला परिचय या अंगाई गीताच्या माध्यमातून होतो.



प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर
मोबाईल नं. 9225313592
ई-1108, कल्पतरू,
ग्लोरिया ग्रेस,
बावधन, पुणे

आई आपल्या बाळासाठी भविष्याची सुंदर स्वप्ने रंगविते. त्याचप्रमाणे, प्रतिभाशाली कलाकार हे सुद्धा एका युगाची स्वप्ने रेखाटत असतात. मात्र हृदयाच्या दूरदर्शी व्यक्तींना एकत्र आणण्याचे सामर्थ्य अशा वेव्ह माध्यमात प्रकटले आहे. आपल्या इतिहास आणि संस्कृतीमध्ये खोलवर रूजलेल्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचा शोध नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या भाषणात घेतला आहे. भारताच्या पौराणिक कथा या नेहमीच संगीत आणि नृत्याचा साज लेऊन प्रकटतात. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातसुद्धा "नाट्यं भावयति लोकम्" हे सूत्र सांगितले आहे. याचा अर्थ नाट्यकला जगाला भावनांची अभिव्यक्ती देते असा होतो. भगवान शिवाचा डमरु म्हणजे पहिला वैश्विक ध्वनी होय. शिवाच्या डमरु या वाद्यातून पहिला आध्यात्मिक ध्वनी प्रकटला. देवी सरस्वतीची वीणा ही ज्ञानाचे प्रतिक होय. भगवान श्रीकृष्णाची बासरी ही प्रेमाचे शाश्वत रूप होय. भगवान विष्णूचा शंख हा सकारात्मक उर्जेचे सामर्थ्य प्रकट करतो. नादब्रह्म ही कल्पना आध्यात्मिक परंपरेशी निगडीत आहे.

पाच मौलिक बिंदूः

एकीकडे माध्यम क्षेत्राचे परिदृश्य बदलत आहे आणि दुसरीकडे ही परिषद नव्या आकांक्षा प्रकट करीत आहे. ह्या परिषदेने पाच प्रमुख बिंदूंना स्पर्श केला आहे. मूलतः ही परिषद म्हणजे एक टर्निंग पॉईट वळण देणारी घटना ठरली आहे आणि ती भारताच्या मनोरंजन माध्यम क्षेत्रातील सुवर्णयुगाची पहाट होय. वेव्ह असे व्यासपीठ ठरणार आहे की, ज्यामुळे भारतीय मनोरंजन उद्योगातील एक नवे पान लिहिले जाणार आहे. भारतीय मनोरंजन उद्योग खर्या अर्थाने




जागतिक बनण्याच्यादृष्टीने या परिषदेला नव्या स्वप्नांची जोड सत्यामध्ये उतरविण्यासाठी दिली जात आहे. हा खर्या अर्थाने एक नवा मैलाचा दगड ठरू शकेल. या परिषदेतील विचार मंथनातून नवे रत्न बाहेर पडेल. यातील प्रमुख पाच बिंदूपैकी पहिला कोणता असेल तर तो मनोरंजन उद्योगातील क्षमता आणि सामर्थ्याचा शोध घेण्यात यश आले आहे. दुसरे म्हणजे या परिषदेने मनोरंजन उद्योगातील वैविध्य, कल्पकता आणि क्षमतांचा शोध घेतला आहे. तिसरे म्हणजे नवोन्मेषशाली, प्रतिभाशाली संशोधकांचा आणि सृजनशील विद्वानांचा समूह मनोरंजन उद्योगाला मार्गदर्शन करण्यासाठी प्रकट झाला आहे. चौथे म्हणजे सर्जनशील आणि कलात्मक क्रांतीचा एक नवा टप्पा भारताने गाठला आहे आणि पाचवा बिंदू म्हणजे भारत या परिषदेच्या रुपाने जागतिक मनोरंजन उद्योगाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यापुढील आव्हानांचा विचार करता असे दिसते की, जगात तंत्रज्ञान विपुल आहे. परंतु कलात्मक प्रतिभाशक्तीची वानवा आहे आणि अशी प्रतिभाशक्ती केवळ भारतीय कलावंतांच्या क्षमतेमध्ये दिसून येते. त्यामुळे भारतात मनोरंजन उद्योग नवी उंची गाठत आहे. कालिदासाचे शाकुंतल असो, मालविकाग्नीमित्र असो की, मेघदूत असो अशा सर्व संस्कृत साहित्यातील अभिजात कलाकृती, चित्रपट, छोटा पडदा आणि अन्य माध्यमातून जेव्हा येतील तेव्हा जगातील संपत्तीचा ओघ भारताकडे वळेल ही एका नव्या सुवर्णयुगाची नांदी ठरेल. नवे प्रयोग, नवी कल्पकता आणि नव्या रोजगार क्षमता यांचा शोध घेत ही परिषद नवी उंची गाठली आहे. केवळ भारतीयच नव्हे तर जागतिक मनोरंजन उद्योगाला नवी दिशा देण्याच्यादृष्टीने ही परिषद एक निर्णायक वळण ठरली आहे. बौद्धिक संपदांच्या निर्मितीतून अगणित संपत्ती निर्माण करता येते व ती राष्ट्राच्या उत्कर्षाचा केंद्रबिंदू ठरू शकते हे या परिषदेमागील खरे सूत्र आहे.

समारोपः

पहिल्या वेव्ह शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी आर्थिक विकासाचा नवा सिद्धांत मांडला आहे. वैश्विक पातळीवरील प्रतिभाशक्ती आणि सर्जनशीलतेला सामावून घेणार्या जागतिक परिसंस्थेचा पाया वेव्ह या व्यासपीठामुळे रचला जात आहे. भारत जगामध्ये कल्पक आशय निर्मितीची राजधानी म्हणून उदयास येत आहे. भारतात श्रेष्ठ कलाकृतींची निर्मिती आणि जगासाठी भव्योदात्त रंजन गुणवत्ता निर्माण करण्याची वेळ आली आहे. या प्रक्रियेत यही समय है, सही समय है, असे ठोस प्रतिपादन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेव्ह परिषदेच्या माध्यमातून प्रखर आत्मविश्वास प्रकट केला आहे.

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की, वेव्ह शिखर परिषदेतील पंतप्रधानांचे भाषण हे आध्यात्मिक परंपरेचा वर्तमान काळाशी असलेला संबंध जोडणारे होते. त्यांनी यही समय है, सही समय है ही भूमिका घेऊन वस्तू व सेवा आणि कलांचे भारतात निर्माण करा आणि जगासाठी ते निर्माण करा असा संदेश दिला. हजारो वर्षाच्या मूल्यांचा खजिना असलेल्या भारतातील कथाकथन परंपरेचे वर्तमान जगातील महत्त्व अनन्य साधारण आहे. प्रत्येक रस्त्यावर एक कथा आहे, प्रत्येक पर्वतावर एक गाणे आहे आणि प्रत्येक नदी एक संगीताचा सूर आहे, राग आहे. भारतातील सहा लाख गावांमध्ये प्रत्येक गावाची स्वतःची लोक परंपरा आणि अद्वितीय कथाकथन शैली आहे. समुदाय लोककथांद्वारे आपला सोनेरी इतिहास जपतात. अध्यात्मिकदृष्टीने विचार करता असे दिसते की, भजन असो, गझल असो, शास्त्रीय रचना असो किंवा समकालीन सूर असो, प्रत्येक सुरात एक कथा आहे आणि प्रत्येक लयीत एक आत्मा आहे. या कथांचा शोध घेऊन आपणास जगाला प्रभावित करणारे कितीतरी सुंदर चित्रपट निर्माण करता येऊ शकतील. भारतीय कथांमध्ये केवळ परंपरा आणि संस्कृतीच नाही तर विज्ञान आहे, धैर्य आहे, शौर्य आहे. त्यामुळे या कथांचे लपलेले शिंपल्यातील मोदी शोधून त्यांचे कोंदण चित्रपट माध्यमाद्वारे प्रकाशामध्ये आणले पाहिजेत. तसेच अंधारात लपलेल्या कोळशाच्या खाणीतील हिर्यांचा शोध घेणे त्यामुळे शक्य होईल. तेव्हा भारतीय परंपरेतील बलशाली सामर्थ्याचा शोध घेऊन तेजःपुंज कथाकथनरूपी हिर्यांची तेजस्वीता वर्तमानात जपण्यासाठी त्यांनी घडविलेले मौलिक विचारमंथन दिशादर्शक असे ठरले आहे. नवा सूर्य सकाळच्या प्रकाशकिरणांनी अनंत आकाश व्यापून टाकतो, प्रभाव उजळतो तशीच ही वेव्ह परिषदेची महती आहे.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559